लोकआरंभ

# शेती काम व महिला आरोग्यासाठी कृषी विज्ञान केंद्र मार्फत प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षणाचे धडे

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : महिलांना शेतीची कामे करताना होणारा त्रास , कष्ट आणि वेळ यामध्ये बचत होण्यासाठी कृषी विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेल्या कष्ट कमी करणाऱ्या यंत्रांचे प्रात्यक्षिक कृषी विज्ञान केंद्र पोखरणी'च्या माध्यमातून महिला शेतकरी व शेतकरी बांधवांना देण्यात आले. बहुतांश शेतकरी भाजीपाला व्यवसाय करतात त्यामध्ये भाजीपाला तोडण्यापासून विकण्यापर्यंतचा भार हा बहुतांश महिलांवर अवलंबून असतो. त्यामध्ये वांगी आणि भेंडी तोडताना महिलांना








हाताला होणाऱ्या त्रासापासून संरक्षण मिळावे तसेच त्यांच्या वेळेमध्ये बचत व्हावी,कष्ट कमी व्हावे याकरिता विद्यापीठामार्फत तयार केले गेलेल्या भेंडी तोडणी यंत्राचे प्रात्यक्षिक गृहविज्ञान तज्ञ प्रा.अल्का पवळे पाटील यांनी मौजे आलेगांव येथील शेतकरी आणि शेतकरी महिलांना दि.६-ऑगस्ट रोजी देण्यात आले. तसेच दि.७-ऑगस्ट रोजी महिलांना स्तनपान आठवडा निमित्त जनजागृती करण्यासाठी स्तनपाणाचे फायदे आणि स्तनदा महिलांचा आहार कसा असावा यावर एक दिवसीय प्रशिक्षण मौजे पोखर्णी येथील महिलांना देण्यात आले.दि.८-ऑगस्ट रोजी मौजे सायाल येथील भुईमूग उत्पादक शेतकऱ्यांना भुईमूग शेंगा फोडणी यंत्राची प्रात्यक्षिक देखील देण्यात आले.या यंत्राच्या माध्यमातून महिलांना शेंगा फोडणीसाठी लागणाऱ्या वेळेमध्ये भरपूर प्रमाणात बचत होते तसेच शारीरिक कष्ट व होणारा त्रास देखील कमी होतो हे प्रात्यक्षिकातून स्पष्ट झाले. सदरील प्रात्यक्षिक आणि प्रशिक्षण कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. एस.डी.मोरे तसेच वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देविकांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.